REVIEW OF RESEARCH

# मालवणी एकांकिकाचे स्वरुप

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी

मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी, जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

लै. वि. कृ. नेरूरकर यांची मालवणी सगीते 'हिज मास्टर्स व्हाईस' ने ग्रामोफोनच्या तबकड्यांद्वारे संपूर्ण महाराष्ट्रभर १९३०-१९३५ च्या दरम्यान पसरवली. त्यानंतर लगेचच एच.एम.व्ही. ने एक मालवणी एकांकिका ध्वनिमुद्रित केली होती. 'मुणगेकर व पाटी' ही त्या एकांकिकेची सादरकरर्ती मंडळी होती. या एकांकिकेच्या संदर्भात अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. कारण काळाच्या प्रवाहाबरोबर 'ग्रामोफोन'चे युग पडद्याआड गेले व त्या तबकड्याही नष्ट झाल्या. पण त्यानंतर मालवणी नभोनाट्यानंतरच्या काळातही मालवणी एकांकिकेच्या संदर्भात माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. गंगाराम गवाणकर यांनी १९६१ मध्ये 'आज काय नाटका होणा नाय' ही मालवणी एकांकिका मुंबईला सादर केली. पुढे हेच सूत्र घेऊन त्यांनी 'वस्त्रहरण' लिहिले. १९७३ मध्ये त्यांनीच लिहिलेल्या मराठी एकांकिकेत 'मी उभा आहे' मध्ये श्रीपाद, विठोबा, कृष्ण इ. पात्रे मालवणी वापर करूण गेली.

त्यानंतरच्या काळात अनेकांनी मालवणीतून एकांकिका लिहिल्या. त्या शाळा, महाविद्यालयांच्या स्नेहसंमेलनांतून सादरही केल्या गेल्या. "त्यात मालवणी मुलुखात वास्तव्य करणारे सावंतवाडीचे सतीश पाटणकर यांचा महत्त्वाचा उल्लेख करता येईल. त्यांनी १९८६ साली अंधश्रद्धेवर आघात करणारी 'गावकी' ही एक दर्जेदार मालवणी एकांकिका लिहिली. सावंतवाडीच्या युवक मंडळाने दि. ६ संप्टेंबर १९८५ रोजी मुंबईच्या शिरोडकर हॉल, परळ येथे ती सादर केली. एक अस्सल मालवणी ढंग असलेली एकांकिका म्हणून 'गावकी' ने स्थान मिळविले"[१] तसेच त्यांनीच पुढे 'माटये आदी गणपती' ही एकांकिका १९८७ साली लिहिली. 'झावळट', 'बघून घेयन' व 'आठवड्याच्या झिलाचा लगीन' ह्या त्यांच्या आणखी काही मालवणी एकांकिका सादर केल्या गेल्या.

अस्सल मालवणी एकांकीका संदर्भात माहिती घेता श्री. गंगाराम गवाणकर यांनी 'आज काय नाटक होणा नाय! ' ही एकांकिका मुंबईला सादर केली. पुढे हेच सुत्र घेऊन त्यांनी गाजलेले 'वस्त्रहरण' नाटक लिहिले. त्यानंतरच्या काळात अनेकांनी मालवणीतून एकांकिका लिहिल्या व त्या शाळा महाविद्यालया च्या स्नेहसंमेलनातून सादरही केल्या. त्यात सतीश पाटणकर यांच्या 'गावकी', 'माट्ये आदी गणपती', 'झाळवट', 'बघून घेयन' व 'आठवड्याच्या झिलाचा लगीन' या विशेष गाजल्या. श्री महेश केळुस्कर यांच्या 'पयलो नंबर', 'घो ह्योच परमेश्वर' आणि 'सरकारी कायदो यमाच्या दारात' या एकांकिका सादर केल्या. तसेच दा. र. दळवी यांनी 'नशिबवान घो खायचो' आणि 'बायल पिवची नशिबवान', या एकांकिका १९८८ साली त्रिदल प्रकाशनाने प्रसिद्ध केली. याच दरम्यान श्री. रमेश माळवदे, श्री. आबासाहेब आचरेकर व श्री. अरविंद म्हापणकर यांनी दर्जेदार मालवणी एकांकिका लिहिल्या. या एकांकिकांचा विषय मनोरंजन, बोध हे असले तरी काही गंभीर प्रवृत्तीचे विषय व मालवणी मुलुखाचे समाजचित्रण यथायोग्य प्रकारे रंगमंचावर सादर करण्यात मालवणी एकांकिकांचे योगदान महत्त्वाचे मानावे लागते.

"सध्या मुंबई आकाशवाणी केंद्रावर नोकरी करणारे महेश केळुसकर यांची 'पयलो नंबर' ही मालवणी एकांकिका जाने १९८६ मध्ये प्रसिद्ध झाली"[२] त्यानंतर दि. ३ व ४ जानेवारी १९८७ रोजी भरलेल्या सावंतवाडी येथील दुरस-या

मालवणी स्नेहसंमेलनात 'घो ह्योच परमेश्वर' आणि 'सरकारी कायदो यमाच्या हातात' या दोन मालवणी एकांकिका सादर केल्या गेल्या.

मुंबईचे श्री. जे. रत्नराज यांनी अनेक मालवणी एकांकिका लिहिल्याचे समजते. तसेच प्रसिद्ध मालवणी कवी श्री. दा. र. दळवी यांनी दोन मालवणी एकांकिका. त्यांची नावे अशी 'नशीबवान घोव खायचो' आणि 'बायल पविची नशीबवान'.

श्री. शंकर शिंदे यांची 'सोना ता सोना' ही पुरुषप्रधानविरहित प्रसिद्ध विनोदी मालवणी एकांकिका १९८८ साली मुंबईच्या त्रिदल प्रकाशनाने प्रसिद्ध केली. तर त्याच दरम्यान श्री. रमण माळवदे यांची 'वाघ इलो वाघ' ही एकांकिका प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'लांडगो इलो रे' ही श्री. आबासाहेब आचरेकर यांची मालवणी एकांकिका १९८८ मध्ये प्रसिद्ध केली. मालवणी भाषेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या एकांकिकेकडे पहावे लागेल. मालवणच्या श्री. अरविंद म्हापणकर यांनी दर्जेदार मालवणी एकांकिका लिहिल्या. आजही शाळा-महाविद्यालये यांच्या दरवर्षी होणा-या स्नेहसंमेलनातून मालवणी मुलुखात एकांकिका सादर केल्या जातात.

या मालवणी एकांकिकांना नंतरच्या काळात १९८० नंतर जी मालवणी नाटकांची लाट आली त्यांच्याबरोबरीने रसिकांची दाद मिळाली. काही गंभीर प्रवृत्तीचे विषय व मालवणी मुलुखाचे समाजचित्रण यथायोग्य प्रकारे रंगमंचावर सादर करण्याच्या कार्याला 'मालवणी एकांकिके' चे महत्त्वपूर्ण योगदान आहे हे मानावेच लागेल.

"रमेश पवार यांच्या 'म्हॅSSS' एकांकिकेत पोलिस, 'टेम्पल एप्लॉयमेंट' मध्ये 'देव' तर 'विमानहरण' एकांकिकेत बहुतेक सर्व पात्रे मालवणी बोली बोलतात".[३]

या एकांकिकांचा विषय मनोरंजन, बोध हेच होते असे दिसते.

### अस्सल मालवणी जीवनदर्शन घडविणा-या एकांकिका

मालवणी एकांकिकांना रंगमंचावर महत्त्वाचे स्थान मिळाले ते मुंबईतील विविध एकांकिका स्पर्धांमधून. ह्या स्पर्धांमुळेच मालवणी एकांकिकेचे लेखन झाले असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये. 'जिद्दी' ही संभाजी सावंत यांची अंधश्रद्धेविरुद्ध लिहिलेली एकांकिका. मालवणी समाजमनातील अंधश्रद्धांचे अचूक चित्रण या एकांकिकाद्वारे त्यांनी केले आहे. नायक 'येंको' हा अशिक्षित असला तरी पुरोगामी विचारांचा आहे. गावच्या 'राखणदार' देवाला बळी म्हणून बकरा द्यायची त्याची पाळी येते तेव्हा तो त्याला स्पष्ट नकार देतो. गावकरी मंडळी त्याला सांगतात की 'तू बकरा दिला नाहीस तर देवाचा कोप होईल' पण तो आपल्या मनाशी ठाम राहतो, गावकरी सर्वच बाबतींत त्याची अडवणूक करतात. त्याच्या शेतावर काम करायला कोणी जात नाही. पण जिद्दी येंका सास-याच्या गावातून माणसं आणून शेतीची कामे करतो. गावदेवस्कीतील प्रथेनुसार 'देवरूढ' ची मिरवणूक त्यांच्या अंगणात येते. प्रथेनुसार त्यांना घरचा कचरा घायचा असतो; पण ते नेत नाहीत. गावच्या विरोधात तो व त्याची बायको उभी राहते. दुर्दैवाने याच दरम्यान त्यांचे तान्हे मूलही मरण पावते. गावकरी त्याला स्मशानात नेण्यास बंदी घालतात. तेव्हा 'मोडान पन वाकायचं नायं' या मालवणी वृत्तीप्रमाणे तो आपल्या घरच्या अंगणात खड्डा तयार करू लागतो आणि रुळलेल्या रूडीलाच गाडून टाकतो, असे कथानक या एकांकिकेचे आहे. अस्सल जिवंत चित्रण, आपल्या विचारांशी ठाम असणारा नायक वाट्टेल त्या परिस्थितीला तोंड देणारी त्याची पत्नी व अत्यंत स्वाभाविक घटना व नाट्यपूर्ण प्रसंगामुळे ही एकांकिका मालवणी एकंकिकेत महत्त्वाचे स्थान पटकावते. मात्र अत्यंत टोकाची भूमिका घेणारे गावकरी हे अपवादाने वास्तवात आढळतील. "मुत्यू झाल्यावर मालवणी माणूस निदान त्या घटनेपुरता सहकार्याची भावना जागृत ठेवणारा आहे हे समाजवास्तव आहे".[४]

बाबी कदम यांची 'धग' ही एकांकिका मालवणी मुलुखातील एका तरल भावस्पर्शी प्रेमप्रकरणावर व त्याच्या करूण शेवटावर प्रकाश टाकते. गावात तात्याचे चहाचे हॉटेल असते. तात्याकडे कपबध्या धुणारी व गि-हाइकांना चहा देणारी 'सकल्या' ही अल्लड गरीब मुलगी असते. तात्याच्या आधाराने हॉटेलातच राहणारा 'छकलो' हा काहीसा वेडसर मुलगा असतो. या दोघांचे गावकरी लग्न लावून देतात. शरीरसंबंध म्हणजे काय हेही ज्ञात नसलेलुआ सकल्याशी छकल्या लग्नानंतर जवळीक साधण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा ती त्याला झिडकरते. तो एकूणच प्रकार तिला 'पाप' वाटतो. "दरम्यान छकल्याच्या वेडेपणाचा फायदा घेऊन हॉटेलचा मालक तात्या सकल्यावर बलात्कार करतो. गंभीर दुखापतीमुळे त्यातच तिचा मृत्यु येतो. वेड्या छकल्याला या प्रकारची जाणीच होते तेव्हा मात्र सकल्यावरीर प्रेमाच्या उफाळयामुळे तो बंड करतो.

रागाच्या भरात हॉटेललाच आग लावतो."[५] एक विलक्षण कथा या एकांकिकेचा विषय आहे. करूण-गंभीर विषय हाताळून लेखकाने हे सिद्ध केले आहे. की मालवणी नाटकांनी ही अशा स्वरुपाचे विषय घेऊन मालवणी नाटक लिहायला हरकत नाही.

नोकरी कामधंद्यासाटी हजारोंच्या संख्येने मालवणी माणसे मुंबईत वास्तव्य करून आहेत. अशाच एका मालवणी जोडप्याची हळूवार भावस्पर्शी कथा 'तीनसांज' या एकांकिकेचा विषय ठरली आहे. "कोकणातील एका जोडप्याने मुंबईत एका खोलीचा संसार थाटला. हे जोडपे आता वृद्धत्वाकडे झुकत असून अनेक उपाय करूनही संतती नसल्याने दु;ख दोघांनाही आहे. डॉक्टर तपासणीत कुणातही दोष नसल्याचे सिद्ध होते; पण निरुपाय होतो शेवटी गावाकडे राहणा-या आपल्या पुतण्यालाच 'मुलगा' मानावे असे काकाला वाटते. आपल्या पुतण्याला शक्यतो सर्व मदत तो करतो. पण बायकोच्या कटकटीमुळे तो हवी तेवढी मदत नंतर करू शकत नाही. पुतण्या स्वबळावर नंतरचे शिक्षण घेतो. त्याला चांगली नोकरीही मिळते. हे सारे यश पाहून काका त्यालाच आपला मुलगा मानायचे ठरवतात आणि त्याच दरम्यान प्रौढ काकीला मूल होण्याची चिन्हे दिसू लागतात. मानवी मनातील एक हळूवार भावकल्पना या एकांकिकेत चित्रित करण्यात आली आहे.

आजोबांच्या आधाराने जगणारा खेडेगावातील एक वेडा मुलग़ा आणि त्याला चिडवणा-या अन्य मुलांची वागणूक चित्रित करण्यात रवींद्र खोत यशस्वी झाले आहेत. (रघूच्या आवशीचो घोव), परित्यक्ता होऊन खेडेगावात राहणा-या एका स्त्रीची व्यथा सु.बा. सरपडवळ यांनी 'येलिवरचा फूल' या एकांकिकेत रंगवली आहे.

'पहिल्याच ओमने केली बोंबाबोंब' (प्रेमकथा), लेखक मामा पेडणेकर, 'अतिथया माती' (भावणीचे लग्न) सदानंद दळवी, 'कवाट बायला' या ॲड. के. डी. सुभेदार यांच्या एकांकिकेत कोकणातील देवदेवस्की आणि वैद्यकीय उपाय यांच्यातील संघर्ष उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. 'वस्त्रहरण' या नाटकाची भ्रष्ट नक्कल करून 'सीता स्वयंवर' ही एकांकीका लिहिली गेली. 'बाळयाचे वस्त्रहरण' ही एकांकिका लिहिली गेली. 'बाळयाचे वस्त्रहरण' ही रंगीत तालमीच्या गोंधळावरील स्त्रीप्रवाहित तुफान विनोदी एकांकिका गणेश हिर्लेकर यांची आहे. तर एका खेडेगावात पारकरांच्या घरासमोरील पाणंदीर बैल रवंथ करीत पडावा तसा वाघ सुस्तावून पडतो. गावातील लोक वाघ मारायला, बघायला जमतात व मिळेल त्या दंडुक्याने वाघाला मारतात. वाघ मारल्याचे समजताच मामलेदार कचेरीतून तपासनीच चौकशीला येतो. सुरुवातीला मोठेपणामुळे बक्षीस मिळेल म्हणून प्रत्येकजण मीच वाघ मारला असे म्हणतात. पण जेव्हा वाघ मारल्याबद्दल शिक्षा होणार हे समजते तेव्हा एकच घावपळ होते. तपासनिसाला 'वडेसागोती' ची मेजवानी दिली जाते. प्रत्यक्षात मात्र सेवनिवृत्त सैनिक देसाई यांनी वाघ बंदुकीने मारलेला असतो. जखमी वाघ गावात येतो व मरूण पडतो. देसाई आपण वाघावर गोळी झाडल्याचे मान्य करतात व तपासनीस आपण तसा रिपोर्ट करेण म्हणजे केस उलगडणं सोपं होईल असे सांगतो. गावकरी खोटे ठरवतात. देसाई अभिमानाने फुगुन हवेत गोळी झाडतो. (वाघ इलो वाघ, लेखक रमण माळवदे (१९८४)) अशा प्रकारे मालवणी जीवणातील विविध वास्तवपूर्ण घटना, प्रसंग हे मालवणी एकांकिकेचे विषय ठरले व ह्या एकांकीका यशस्वी ठरल्याचेही दिसून येते.

## संदर्भ


१) पाटणकर सतीश, 'गावळी' - एक दर्जेदार शोकांतिका, दै. रत्नभूमी ७.९.१९८५, दै रत्नभूमि, रत्नागिरी ७.९.१९९५, पृ.४.
२) केळूस्कर महेश, 'पयलो नंबर', त्रै. आरती, जाने. १९८६, पृ.९ ते १९
३) पवार रमेश, विमानहरण आणि दोन एकांकिका', 'मॅकेस्टिक बुक स्टॉल, जुन १९८४, मुंबई.
४) नाडकर्णी कमलकर, 'मालवणी नाटकांविषयी - दै महाराष्ट्र टाइम्स, '२१/५/१९९५, पृ.६
५) हिर्लेकर गणेश. 'बाळयाचे वस्त्रहरण' त्रिदल प्रकाशन. प. आ. १९८४, मुंबई